ANNEXURE "E" (COLLY)

# कर्जत नगरपरिषद,कर्जत

ता.कर्जत. जि.रायगड

वाचले : १) श्री हुसेन शौकत लालानी, डायरेक्टर, व्हॅलेनटाईन प्रॉपर्टीज प्रा.लि, लालानी ऑरा, ३४ वा रस्ता, ७ वा मजला बांद्रा पश्चिम, मुंबई ५० यांचे तर्फे एम.एस.चौव्हान दिनांक २४/०१/२००९

२) मा.जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांजकडील बिनशेती आज्ञापत्र क्र.मशा/अ१ /बिनशेती / ४९९९५ /प्र.क्र.२४२/९४, दिनांक ३०/०५/१९९५

३) वास्तुविशारद, मिनाक्षी सिंग चौव्हान यांचे दिनांक २५/०८/२००९ चे कार्पेट एरीयाचे स्टेटमेंट

७३०२ /०९-१०

क्र.सुधारीत बांधकाम /इमारत/कात-१/एसआर- २५/०८-०९
कर्जत नगरपरिषद कार्यालय, कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड.
दिनांक २६-०८-२००९.

क अं जा
४३३३/२०१०

## आज्ञापत्र

श्री. हुसेन शौकत लालानी, डायरेक्टर व्हॅलेनटाईन प्रॉपर्टीज प्रा.लि. यांचे तर्फे एम.एस.चौव्हान यांनी मौजे दहिवली तर्फे निड येथील स.नं./गट नं.११२ बिनशेती भुखंड क्र.१ ते २७ व रस्ताखालील क्षेत्र(५८) एकूण क्षेत्र १७७७६.०० चौ.मी. व खुली जागा या जागेवरील रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ करावयाच्या सुधारीत बांधकाम नकाशास मंजूरी मिळणे बाबत इकडे विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदाराची विषयांकीत जागेस मा. .जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांजकडील बिनशेती आज्ञापत्र क्र.मशा/अ१ /बिनशेती / ४९९९५ /प्र.क्र.२४२/९४, दिनांक ३०/०५/१९९५ अन्वये बिनशेती परवानगी दिलेली आहे. अर्जदाराची विषयांकीत जागा ही मंजूर विकास योजना कर्जत (सु+पा.क्षेत्र) (२००१-२०२१) नुसार रहिवास विभागात अंतर्भूत आहे

सदर कामी अर्जदार यांनी बिनशेती रेखांकनातील विकास योजने मधील रस्त्यांचे व नवीन रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्रफळाचा F.S.I. मागीतला असले मुळे नगरपरिषद कर्जत यांचे नावे दिनांक १२/१२/२००८ रोजी मा.दुय्यम निबंधक, कर्जत यांचेकडे अनु क्रमांक क.अ.ज.८३६०/२००८ अन्वये इकरारनामा पत्रक नोंदवून दिलेले आहे. सादर केलेला नकाशा व संबंधीत कागदपत्रे यांची तांत्रिक छाननी केली असता ती छाननी तक्त्यानुसार बरोबर आढळून आली असून त्या अन्वये सदर नकाशात हिरव्या रंगाने दुरुस्ती करुन नकाशास मंजूरी देण्यात आली आहे.

वरील परिस्थिती अवलोकन करता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ / कलम ५१,२ व कर्जत न.प.ने मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ११.१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, मुख्याधिकारी, कर्जत नगरपरिषद, वरील सुधारीत बांधकामास / नकाशास खालील अटी व शर्तींवर मंजूरी देत आहे.

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR KARJAT

*अटी व शर्ती :*

१) वरील जागेचा व नियोजित सुधारीत इमारतीचा वापर फक्त रहिवास व वाणिज्य वापर या कारणासाठी करणेत यावा. व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.

२) स्थळदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील, मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्षात जागेवर किमान असली पाहीजेत व त्या खालील जागा कायम खुली ठेवली पाहीजे व त्याची खात्री नगरपरिषदेस करुन देणे अर्जदारांवर / विकासकांवर बंधनकारक राहील.

३) नियोजित बांधकामाचे भूखंडातील अस्तित्वातील बांधकामे धरुन जोत्याचे एकूण क्षेत्र भूखंडाच्या निव्वळ क्षेत्राच्या १/३ इतके प्रत्यक्ष जागेवर कमाल राहिले पाहिजे.

४) बांधकामास सुरुवात करणेपुर्वी या कार्यालयाकडे लेखी स्वरुपात त्या बाबतची माहिती देणे. अर्जदार / विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

५) जोत्या पर्यंतचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुविशारदाचे व विकासकाचे मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्या बाबतचे प्रमाणपत्र नगरपरिषदेस सादर करण्यात यावे त्यानंतर प्लोन्थ चेकिंगचा दाखला नगरपरिषदेकडून घेतल्या शिवाय पुढील बांधकाम सुरु करु नये.

६) बांधकाम पुर्ण झाल्यावर या कार्यालयाकडील वापर परवाना घेतल्याशिवाय बांधलेल्या जागेचा वापर सुरु करु नये. तसे आढळून आल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ व महाराष्ट्र नगरपालिका (ब आणि क वर्ग) साठी असलेल्या प्रमाणभूत बांधकाम उपविधी आणि विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार अर्जदार / विकासकांवर कायदेशीर कारवाई करणेत येईल.

७) प्रकाश व वायुवीजन यासाठी ठेवलेल्या खिडक्यांचे क्षेत्र हे मंजूर नकाशा प्रमाणे असावे.

८) सदरहू बांधकामामुळे नगरपरिषदेच्या विकास आराखड्यात (डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये) किंवा अन्य कोणत्याही